## ' शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती ' २०२१–२०२२ करिता नामांकन अर्ज सादर करण्याबाबत

# सुचनापत्र

१. ऑनलाईन अर्जाची **Print Out** ही एका पानापेक्षा जादा पानांची असून, अर्ज भरल्यावर विद्यार्थ्याने सदर अर्ज हा टूल बार वरील **Export option click** करुन **PDF** मध्ये **Export** करावी व त्याची प्रिंट घेण्यात यावी, त्यानंतर सदर अर्जासोबत मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्य व रु. १/– चा स्टॅम्प लावलेली ॲड.स्टॅम्प रिसीटावर संबंधित विद्यार्थ्याची सही घेवून सदरचा अर्ज मा. प्राचार्याकडे पडताळणीसाठी सादर करण्यात यावा. मा. प्राचार्यानी नियमावलीनुसार ज्या त्या घटकासाठी आवश्यक असलेल्या छायांकित कागदपत्रांची पडताळणी करुन आपल्या सही व शिक्क्यासह विद्यापीठाकडे नामांकन अर्ज सादर करावेत.संबंधित महाविद्यालय /अधिविभागाने विद्यार्थ्याचे प्राप्त झालेले अर्ज हे आवश्यक त्या कागदपत्रांसह त्यांची वर्गवारी करुन या कार्यालयास **दि.०५/०२/२०२२** पर्यंत पाठवावेत.

२. विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान, आंतर–विद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखांनिहाय ६० टक्केपेक्षा अधिक गुण मिळवून गुणाक्रमे प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होवून भाग १ वरुन भाग २ ला प्रवेशित, भाग २ अभ्यासक्रमात उत्तीर्ण होवून भाग ३ ला प्रवेशित, व पदव्युत्तर पातळीवरील भाग १ या अभ्यासक्रमास आपल्या महाविद्यालय/ अधिविभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनी प्रत्येक वर्गात संभाव्य पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींची गुणवत्ता यादी परीक्षा विभागाकडून या विभागास प्राप्त झालेली आहे. सदरची **संभाव्य पात्र** विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in/या वेबसाईटवरील Shivaji University Merit Scholarship या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. संबंधित संभाव्य पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनीनी आपले ऑनलाईन अर्ज तात्काळ भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्जाच्या हार्ड कॉपी आपल्या महाविद्यालय /अधिविभागात जमा करावयाचे आहेत याची संबंधितानी कृपया नोंद घ्यावी.

३. संलग्नीत महाविद्यालये/पदव्युत्तर अधिविभागानी उपरोक्त संकेत स्थळावर ठेवण्यात आलेल्या गुणवत्ता यादीमध्ये एखादया अभ्यासक्रमाचा समावेश नसल्यास सदर अभ्यासक्रमाच्या संभाव्य पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरुन घ्यावेत व आवश्यक त्या कागदपत्रासह या कार्यालयाकडे उपरोक्त तारखेपर्यंत पाठवावेत. तसेच त्याबाबतची माहिती संबधीत परिक्षा विभाग/पदव्युत्तर प्रवेश विभाग यांना देण्यात यावी.

४. संबधीत महाविद्यालये/अधिविभागानी सर्वसाधारण घटकातील संकेतस्थळावर ठेवण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांच्या नामांकन अर्जाबरोबर अर्थिक दुर्बल घटक, निराधार घटक, दिव्यांग घटक, गुणवंत खेळाडू तसेच यावर्षीपासून नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या **शहीद सन्मान शिष्यवृत्तीचेही** ऑनलाईन नामांकन अर्ज भरून घेवून उपरोक्त दिनांकास सादर करावेत

५. कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयातून मार्च/एप्रिल २०२१ मध्ये १२ वी च्या परीक्षेत प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होवून ६० टक्केपेक्षा अधिक गुण मिळवून गुणानुक्रमे उत्तीर्ण झालेल्या व आपल्या महाविद्यालय /अधिविभागात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र या विद्याशाखानिहाय भाग १ या वर्गात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यापैकी प्रत्येक विद्याशाखेतील सर्वाधिक गुण मिळविलेल्या गुणानुक्रमे पहिल्या **फक्त दहा (१०) विद्यार्थ्यांचे** वरील प्रमाणे ऑनलाईन अर्ज भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यालयास उपरोक्त दिलेल्या तारखेपूर्वी पाठवावेत

६. महाविद्यालय /अधिविभागानी संबंधित संभाव्य पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींच्याकडुन प्राप्त झालेल्या अर्जाची हार्ड कॉपी या नियमावलीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह विद्यार्थ्यांच्या अर्जाची वर्गवारी करुन सत्वर त्या त्या वेळी उलट टपाली स्वखर्चाने या कार्यालयास पाठवावेत.तसेच शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती सन २०२१–२०२२ करीता पात्र विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जाच्या हार्ड कॉपी **दि. ०५/०२/२०२२** पर्यंत प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांच्या शिफारशीसह सादर करुन विद्यापीठास सहकार्य करावे. तद्नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

७. सदर माहिती संलग्नीत महाविद्यालयातील/अधिविभागातील प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांच्या तसेच संबंधित टेबलचे काम पहाणारे लेखनिक यांच्या निदर्शनास आणण्यात यावी. तसेच सदरची माहिती विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा ठिकाणी नोटीसबोर्डवर लावण्यात यावी. सदर शिष्यवृत्ती योजनेच्या नियमांमध्ये बदल/सुधारणा करावयाचे अधिकार तसेच एखादया शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांबाबत वर्गातील अनुपस्थिती, वर्तणूक इत्यादी संदर्भात प्रतिकूल अहवाल आढळल्यास संबंधित विद्यार्थ्याकडून शिष्यवृत्ती काढून घेण्याचे सर्व अधिकार विद्यापीठास राहील.

८. शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ करीता गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणा–या या पात्र विद्यार्थ्यांनी (ईबीसी, पीटीसी व एसटीसी सवलत वगळून) विद्यापीठाची/राज्य शासनाची/केंद्र शासनाची यापैकी कोणतीही शिष्यवृत्ती घेत नसल्याबाबतचे हमीपत्र संबंधित महाविद्यालय /अधिविभागाचे मा. प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत पाठविणे आवश्यक आहे. तसेच संबधीत विद्यार्थ्यांचा **राष्ट्रीयकृत बॅकेतील बॅक खाते क्रमांक IFSC Code & MICR Code इत्यादी माहिती, आधारकार्ड छायांकित प्रत व विद्यार्थ्यांचे मतदार ओळखपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे .**

९. ज्या महाविद्यालयांनी या कालावधीत मॅन्यूअल अर्ज विद्यापीठाकडे पाठविले आहेत अशा महाविद्यालयांनी या परिपत्रकाच्या अनुषंगाने संबंधित विद्यार्थ्यांकडून नव्याने ऑनलाईन अर्ज भरुन पाठवावेत. यापूर्वी पाठविण्यात आलेल्या मॅन्यूअल अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्र व्यवहारही केला जाणार नाही तसेच अशा प्रकारचे विद्यापीठास प्राप्त झालेले अर्ज दप्तरी दाखल केले जातील याची कृपया नोंद घ्यावी

१०.महाविद्यालये/पदव्युत्तर अधिविभागानीं उपरोक्त शिष्यवृत्तीबाबत अधिक माहिती करिता पदव्युत्तर प्रवेश विभाग, खोली क्रं २०२ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे दूरध्वनी क्रं. (०२३१) २६०९१४२ येथे संपर्क करावा.

––––––––––––––––––––––––––ooo––––––––––––––––––––––––––